सकाळ

# यशवंत विद्यालयातर्फे स्वच्छता अभियान

**खडकवासला :** रयत शिक्षण संस्थेचे खडकवासला येथील यशवंत विद्यालय, पंख संस्था व क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शाळांगण प्रकल्पांतर्गत, खडकवासला ग्रामपंचायत यांच्या सहकार्याने शाळांगण प्रकल्पातील विद्यार्थ्यांमार्फत गावामध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या अभियानांतर्गत गाव, कालव्यालगतचा परिसर, तसेच भैरवनाथ मंदिरात स्वच्छता करण्यात आली. प्लॅस्टिकमुक्त ही संकल्पना 'बदलू वर्तन, घडवू परिवर्तन' या माध्यमातून समाजापर्यंत पोचविण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मराठी अभिनेते व दिग्दर्शक सागर तळाशीकर होते. पोलिस निरीक्षक अशोक शेळके, सहायक पोलिस निरीक्षक स्मिता पाटील, क्विक हिल फाउंडेशन सीएसआर प्रमुख अजय शिर्के, जिल्हा परिषद सदस्य जयश्री पोकळे, खडकवासलाचे सरपंच सौरभ मते, उपसरपंच पूनम मते, ग्रामविकास अधिकारी अरुण हेगडे, पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे, ट्रस्टी कल्याणी भावड, मुख्याध्यापिका विद्या पवार, पर्यवेक्षक संजय बांदल आदी मान्यवर कार्यक्रमात सहभागी झाली.



**खडकवासला : यशवंत विद्यालय, पंख संस्था, क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांमार्फत स्वच्छता राबविण्यात आली.**

या वेळी तळाशीकर यांनी मुलांनी केलेल्या स्वच्छतेचे कौतुक केले. मुलांनी या वयात बाह्य आकर्षणांना बळी न पडता. ध्येयाचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे, अशा प्रकारचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंख संस्थेच्या समन्वयक मैथिली बंडी यांनी केले. नियोजन पंख संस्था समुपदेशक सचिन भापकर, मृणाल मापुस्कर व श्वेता सूर्यवंशी यांनी केले. विद्यालयातील सर्व शिक्षक यात सहभागी होते. विद्यार्थ्यांच्या स्वच्छता गटांचे नेतृत्व शीतल चवरे व अमोल जानराव यांनी केले.